A.Y.2022-2023

News paper Cuttinging

सकाळ



मालेगाव शहर : मसगा महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना प्राचार्य डॉ. सुभाष निकम, अधीक्षक जयवंत कट्यारे व शिक्षक.

## मसगा विद्यालयात प्रतिमापूजन

मालेगाव शहर : येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांना ३६६ व्या जयंतीनिमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. डी. के. हलवर ,शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रवीण पाटील आदी उपस्थित होते. कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे यांनी छत्रपती संभाजी राजांच्या जीवन कार्यावर व पराक्रमावर प्रकाश टाकला. यावेळी प्राचार्य डॉ. निकम यांनी छत्रपती संभाजी राजांच्या पराक्रमावर व त्यांच्या राजनीतीवर प्रकाश टाकला. छत्रपती संभाजी राजांनी समाजात कधीही जात, धर्म पाळला नाही. त्यांनी रयतेसाठी आपले जीवन कार्य समर्पित केलेले होते. सूत्रसंचालन प्रा. एस.एल. अहिरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Date :4 may 2023

सोमवार, दि. ८ मे २०२३

# मसगा कॉलेजात बुद्ध पौर्णिमा साजरी



मालेगाव । येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात बुद्ध पौर्णिमे निमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांच्या हस्ते भगवान गौतम बुद्धांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी टी. वाय.बी.ए. चा विद्यार्थी वैभव कदम याने भगवान गौतम बुद्धांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. गौतम बुद्धांनी जनतेला सहिष्णुता व मानवतेचा संदेश दिला. गौतम बुद्धांच्या विचारांनी आणि शिकवणीने जगाला एक नवीन मानवतेचा मार्ग दाखवला असे मनोगत वैभव कदम यांनी व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी भगवान गौतम बुद्ध हे तत्त्वज्ञ व अखिल मानव जातीसाठी वंदनीय होते. त्यांचे हजारो अनुयायी देश-विदेशात मानवतेचा व दयेचा संदेश देत आहे. गौतम बुद्धांच्या विचारांचे अनुकरण केल्यास सबंध विश्वात शांतता व आनंद नांदेल असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे डॉ. डी. के. हलवर, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील, कुलसचिव श्री. रघुनाथ शेलार तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. रामेश्वर पवार यांनी केले.

Date-8 May 2023

दैनिक शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज
# महाराष्ट्र सारथी

# म.स.गा. महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे जयंती उत्साहात साजरी

**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**मालेगाव ।प्रतिनिधी :**

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे यांची ९४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष निकम यांच्या हस्ते लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या प्रतिमेचे पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहात लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या जीवन कार्यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

पहिले व्याख्यान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. अजय ठाकरे यांचे संपन्न झाले. प्रा. अजय ठाकरे यांनी लोक नेत्यांच्या आर्थिक, सामाजिक, सहकार, व शैक्षणिक जीवन कार्याचा सविस्तर आढावा घेतला. याप्रसंगी दुसरे व्याख्यान वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी



विभाग प्रमुख डॉ. अर्जुन नेरकर यांनी लोकनेते व्यंकटराव हिरे यांनी केलेल्या जन हिताचे कार्य उपस्थितांसमोर मांडले महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील लोकांचा पाणी प्रश्न लोकनेत्यांनी मेहनतीने व निष्ठेने सोडविला. अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी लोकनेत्यांच्या समाजाभिमुख कामांचा आढावा घेतला. लोकनेते हे त्यांच्या कर्तुत्वाने घडलेत. महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या माध्यमातून बहुजनांच्या मुलांना वैज्ञानिक व व्यावसायिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी.के. हलवर, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील, कुलसचिव श्री. आर. एच. शेलार, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य अजिंक्य ठाकरे उपस्थित होते. कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ महा विद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी व आभार प्रदर्शन प्रा. एस. आर. दुकळे यांनी केले.

25 April 2023

# मानव विकास हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याचा केंद्रीय दृष्टिकोन होता-डॉ.एम.व्ही.हिरे



**मालेगाव:-महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख व अर्थतज्ञ, सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. एम.व्ही. हिरे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम हे होते.**

प्रतिमा पूजनानंतर झालेल्या व्याख्यानात डॉ. एम.व्ही. हिरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन हा मानव विकासाचा होता असे प्रतिपादन केले. ब्रिटिश राजवटीत हिंदुस्थानची होत असलेली आर्थिक पिळवणूक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शैक्षणिक जीवनात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विदेशात शिक्षण घेत असताना जगासमोर मांडले. वैज्ञानिक संशोधन पद्धतीचा आधार घेत बाबासाहेबांनी ब्रिटिश राजवटीत हिंदुस्तान-चे होणारे आर्थिक पतन संदर्भात निहाय स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेबांना गरिबी व शोषण मुक्त भारताची उभारणी करायची होती. त्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी व्यापक स्वरूपात कार्य हाती घेतले होते. साम्यवादी विचारसरणीचा अवलंब करून त्यांनी देशात मिश्र अर्थव्यवस्था असावी असा दृष्टिकोन मांडला होता. सर्वसामान्य जनतेला समान न्याय व समान हक्क मिळावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले जीवन खर्च केले.

भारतीय शेती क्षेत्रावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी औद्योगिकीकरणाची आवश्यकता आहे असे ठामपणे सांगितले. म्हणून स्वातंत्र्या नंतर १९४८ मध्ये पहिले औद्योगिक धोरण जाहीर करावे लागले. सर्वसामान्य जनतेवर सरसकट कराची आकारणी करू नये तर उत्पन्ना नुसार कराची आकारणी करावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आग्रही होते. स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पंडित जवाहर लाल नेहरूंच्या पहिल्या मंत्रिमंडळात स्वतंत्र भारताचे पहिले सामाजिक न्याय व कायदामंत्री झाले. तेव्हा त्यांनी समाजातील सर्व स्तरातील व सर्व प्रवर्गातील महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवायचे होते. त्यासाठी व्यापक समाज कल्याणासाठी हिंदू कोड बिल संसदेच्या पटलावर मांडले होते. परंतु तत्कालीन काही शासनकर्त्यांच्या विरोधामुळे त्यांना महिलांच्या सक्षमीकरणासाठी अडचण निर्माण झाली. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री-पुरुष समानतेवर ठाम राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या सर्व कार्यातून त्यांचा दृष्टिकोन हा मानव विकासाचाच होता असे स्पष्ट होते. असे डॉ. एम.व्ही.हिरे यांनी विविध उदाहरणांचा दाखला देत सविस्तर स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्व समावेशक विचारसरणीचे होते असे गौरव उद्गार काढले. वयाच्या २२ व्या वर्षी परदेशी विद्यापीठात उच्च शिक्षण घे-तले. तत्कालीन विश्व प्रसिद्ध कोलंबिया व लंडन विद्यापीठात अर्थशास्त्र विषयातील संशोधन कार्य केले. संशोधनकार्यासाठी हाती घेतलेले विषय ब्रिटिश राजवट भारताची कशा पद्धतीने आर्थिक पिळवणूक करत आहे हे स्पष्ट केले.

अर्थशास्त्र विषयातील डी.एस. सी. (डॉक्टर ऑफ सायन्स) ही पदवी प्राप्त केलेले आजपर्यंत ते एकमेव भारतीय आहेत ही भारतीयांसाठी गौरवाची बाब आहे. भारतात विविध विचारधारे चे प्रवर्ग आहेत. परंतु भारतीय संविधान हिच एक सर्वमान्य विचारधारा आहे. म्हणून भारतात विविधतेत एकता आहे. याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना द्यावे लागते. संविधानामुळे सर्व भारतीयांना मूलभूत हक्क आणि कर्तव्य मिळाले आहेत. यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महामानव ठरतात. असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी काढले.

व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. डी. के. हलवा, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे व कार्यालयीन अधीक्षक श्री. जयवंत कटारे उप-स्थित होते. कार्यक्रमासाठी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले. व आभार प्रदर्शन इंग्रजी विभागाचे प्रा. हिरालाल नरवाडे यांनी केले.

14 April 2023

सकाळ

# मसगा महाविद्यालयात क्रांतिकारकांना अभिवादन

▸ सकाळ वृत्तसेवा

मालेगाव शहर,ता.२४: येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात शहीद दिनानिमित्त क्रांतिकारकांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांच्या हस्ते भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

क्रांतिकारकांनी भारत मातेची गुलामीतून मुक्तता करण्यासाठी क्रांतीची मशाल पेटविली व व्यापक स्वरूपात जनआंदोलन निर्माण केले. क्रांतिकारकांनी दिलेल्या बलिदानामुळे भारत गुलामीतून मुक्त होऊन स्वतंत्र झालेला आहे. प्रा. एस.एल. अहिरे यांनी हुतात्मा राजगुरू, भगतसिंग व सुखदेव याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

सूत्रसंचालन प्रा. अजय आहेर यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ.प्रवीण पाटील, कुलसचिव रघुनाथ शेलार, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कटारे, कनिष्ठचे उपप्राचार्य प्रफुल्ल निकम, उपप्राचार्य अजिंक्य ठाकरे, पर्यवेक्षक रवींद्र मोरे उपस्थित होते. डॉ. बी. एम. सोनवणे यांनी आभार मानले.

23 march 2023

# बाजी प्रभुंच्या रक्ताने पावन झाली पावनखिंड– शिवचरित्रकार डॉ.हिरे



मालेगांव । छत्रपती शिवाजी महाराज सिद्धी जोहरचा वेढा मोडून पन्हाळगडावरून विशाल गडाकडे निघाले त्यावेळी महाराजांबरोबर होते त्यांचे शुर व कर्तव्यनिष्ठ सरदार बाजीप्रभू देशपांडे व मोजकेच मावळे आणि मागे होता सिद्धी जोहर व त्याची भली मोठी फौज त्यावेळी महाराज पावनखिंडीपर्यंत आले त्यावेळेस बाजीप्रभू देशपांडे यांनी महाराजांना विनंती केली की तुम्ही पुढे व्हावे आम्ही गनिमास पावनखिडित अडवून धरतो व जोपर्यंत पन्हाळगडावरून तोफांचा आवाज ऐकू येत नाही तोपर्यंत एकही शत्रू पा– वनखिंड ओलांडू शकत नाही, आणि जोपर्यंत महाराज गडावर पोहोचून बाजीप्रभू देशपांडे यांना तोफांचा आवाज ऐकू येत नाही तोपर्यत त्यांनी खिंड लढवली व शेवटच्या क्षणी ते धारातीर्थी पडले, पावनखिंडीचा हा थरारक इतिहास शिवचरित्रकार प्रा. डॉ. प्रमोद कुमार हिरे यांनी महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प येथे प्राध्यापक प्रबोधनीच्या उद्घाटन प्रसंगी सांगितला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष निकम हे अध्यक्षस्थानी होते त्यांनी आजच्या तरुणांना छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन जीवनामध्ये त्यांच्यासारखे वागावे व त्यांचे गुण अवगत करून समाज व राष्ट्रीय हिताचा विचार करावा असे सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. जी. जे. भामरे यांनी तर प्रास्ताविक प्रा. डॉ. सी.डी. राजपूत यांनी केले, उपस्थिथांचे आभार प्रा. एस. एल आहिरे यांनी मानले कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी यांचसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज
महाराष्ट्र सारथी

# बाजीप्रभूंच्या रक्ताने पावन झाली पावनखिंड – प्रा. डॉ. प्रमोदकुमार हिरे

महाराष्ट्र सारथी वृत्तपत्रसेवा
मालेगांव प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराज सिध्दी जोहरचा वेढा पन्हाळगडावरून विशाल गडाकडे निघाले त्यावेळी महाराजांबरोबर होते त्यांचे शुर व कर्तव्यनिष्ठ सरदार बाजीप्रभू देशपांडे व मोजकेच मावळे आणि मागे होता सिध्दी जोहर व त्याची भली मोठी फौज त्यावेळी महाराज पावनखिंडीपर्यंत आले त्यावेळेस बाजीप्रभू देशपांडे यांनी महाराजांना विनंती केली की तुम्ही पुढे व्हावे आम्ही गनिमास पावनखिडित अडवून धरतो व जोपर्यंत पन्हाळगडावरून तोफांचा आवाज ऐकू येत नाही तोपर्यंत एकही शत्रू पावनखिंड ओलांडू शकत नाही, आणि जोपर्यंत महाराज गडावर पोहोचून बाजीप्रभू देशपांडे यांना तोफांचा चा आवाज ऐकू येत नाही तोपर्यंत त्यांनी पावनखिंड लढवली व शेवटच्या क्षणी ते धारातीर्थी पडले असा पावनखिंडीचा दैदिप्यमान इतिहास

कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या ११८ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या समाधीस्थळी आयोजित व्याख्यानमाले प्रसंगी दुसरे पुष्प गुंफत असताना प्रा. डॉ. प्रमोदकुमार हिरे यांनी पावरपॉइंट च्या माध्यमातून उपस्थित श्रोत्यांना रोमांचित केले. महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे विश्वस्त तथा नामपुर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश शिरुडे अध्यक्षस्थानी होते ,यावेळी, मसगा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष निकम, संचालक प्रा. ए .एस. पवार, केबीएच विद्यालयाचे प्राचार्य के. डी. दाभाडे उपस्थित होते.



कर्मवीरांचे विचार त्यांचे कार्य हे समाज व राष्ट्रहिताचे होते असे डॉ. दिनेश शिरुडे अध्यक्षीय मनोगत मांडतांना म्हणाले प्रारंभी महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले , प्राचार्य के.डी दाभाडे यांनी प्रास्ताविकात व्याख्यानमालेच्या इतिहासाचा आढावा घेतला प्रा.डॉ. दिपांजली बोरसे यांनी सूत्रसंचालन केले पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ अनिता नेरे यांनी करून दिला. कार्यक्रमास विविध शाळा, महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित .



1 March 2023

सकाळ

## इंद्रजित देशमुख : मालेगावला कर्मवीर भाऊसाहेब हिरे व्याख्यानमाला

# जीवन जगताना सकारात्मकता महत्त्वाची



मालेगाव: कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेत समारोपस्थळी बोलताना इंद्रजित देशमुख.

▸ सकाळ वृत्तसेवा

मालेगाव शहर, ता. ३ : जीवन सहजतेने कसं जगायचं हे आपण ज्ञानाचं असतं. भाकरी ताजी असावी शिळी !! देई भुकेल्या वेळी विठ्ठला!! जगताना आपल्याला सगळ्यांना भाकरी लागते व ती भुकेच्या वेळी लागते, ज्याला भूक लागत नाही त्याला भाकरीचे मोल कळत नाही, ज्याच्यासाठी अन्न काय लागते तर अंग भरून यावे, कोरोनाच्या काळामध्ये आपण सर्वांनी त्याचा अनुभव घेतला आहे. दोन वर्षांच्या काळात आपण अतिशय कमी साधनांवर देखील आयुष्य जगू शकतो हे शिकलो. त्यामुळे जगताना सकारात्मक व्हा असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक इंद्रजित देशमुख यांनी केले.

कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मरणार्थ आयोजित दोन दिवसीय व्याख्यान मालेतील पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते.

यावेळी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. हरीश आडके अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे महासचिव डॉ. व्ही.एस. मोरे, आदिवासी सेवा समितीचे पी.डी. हिरे, समाजाचे प्राचार्य डॉ.सुभाष निकम, नामपूरचे प्राचार्य डॉ. दिनेश शिरुडे, महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज, संचालक प्रा. ए. एस. पवार, केबीएचे प्राचार्य के.टी. शार्दुळ उपस्थित होते.

डॉ.देशमुख पुढे म्हणाले, की मनुष्य हा निसर्गातील फॅक्टरीत तयार झालेले देवाचे मॉडेल आहे. माणसाच्या जीवनाकडून सकारात्मक बाजू सांगताना त्यांनी विविध प्रकारच्या दानामध्ये शिक्षण हे दानातील सर्वश्रेष्ठ दान आहे व शिक्षण समाजातील सर्वांत श्रेष्ठाच्या माणसांपर्यंत पोचवावे, कर्मवीर भाऊसाहेब हिरे व कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेले प्रयत्न सांगताना, गुरूकडून पंख घ्या, सूर्याकडून तेज घ्या, फुलाकडून सुवास घ्या वाऱ्याकडून वेग घ्या असे त्यांनी सांगितले.

कर्मवीरांच्या विचारांच्या विविध कार्यांना वारसा घेऊन आम्ही सर्व वाटचाल करीत आहोत असे डॉ. हरीश आडके अध्यक्षीय मनोगत मांडताना म्हणाले. डॉ. सुभाष निकम यांनी प्रास्ताविकात व्याख्यानमालेच्या इतिहासाचा आढावा घेतला. प्रा. डॉ. अनिता हिरे यांनी सूत्रसंचालन केले.

1 March2023

# मसगा महाविद्यालयात शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांना अभिवादन



मालेगांव:-महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे सहकार व शिक्षण महर्षी, संयुक्त महाराष्ट्राचे प्रणेते, थोर स्वातंत्र्यसेनानी, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्था व आदिवासी सेवा समितीचे संस्थापक कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांची ११८ वी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष निकम यांच्या हस्ते कर्मवीरांच्या समाधी स्थळाला व पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

तदनंतर महाविद्यालयात संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करून सामूहिक राष्ट्रगीत म्हणण्यात आले. महाविद्यालयात कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या प्रतिमेचे पजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष निकम हे होते. या प्रसंगी प्रा.एन. डी. पगार यांचे कर्मवीरांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. कर्मवीरांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, शैक्षणिक क्षेत्रातील, कृषी क्षेत्रातील तसेच सहकार क्षेत्रातील योगदाना विषयी माहिती दिली.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. डी. के हलवर, शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रविण पाटील ,कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, प्रा. अजिंक्य ठाकरे, कुलसचिव रघुनाथ शेलार यांच्या सह सर्व प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

1 March 2023

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांची जयंती साजरी



**मालेगाव ।**

येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त व बडोदा संस्थानचे अधिपती महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ऊपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनिष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील, रजिस्ट्रार आर. एच. शेलार, जयवंत कटारे तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयाची पदव्युत्तर वर्गाची विद्यार्थिनी समीक्षा वाघ यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या जीवन कार्याविषयी माहिती देताना असे सांगितले की, महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अनेक लोकोपयोगी काम केले. देशातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. बडोदा संस्थान हे देशातील पहिले असे संस्थान होते की ज्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. व शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. महाराजा सयाजीराव गायकवाड हे कलागुणांना वाव देणारे राजे होते असे गौरवोद्गार समीक्षा वाघ यांनी काढले. तसेच वाणिज्य शाखेच्या पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी समीक्षा शिंदे हिने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमाची माहिती सांगितली. छत्रपती संभाजी महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा वसा पुढे चालवला. छत्रपती संभाजी महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य हिंदवी स्वराज्यासाठी अर्पण केले होते. परंतु स्वत यांनी केलेल्या दगाबाजीमुळे त्यांना आपल्या जीवनाचे बलिदान द्यावे लागले.

याप्रसंगी प्राचार्य दिघावकर यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे जीवन कार्य सर्व भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीराजे व महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे जीवन कार्य समाजापर्यंत पोहोचवावे असे आव्हान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. एन. ए. डोखे यांनी मानले.

# म.स.गा. महाविद्यालयात शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा

मालेगाव कॅम्प:-महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प येथे महाराष्ट्रा चे आराध्य दैवत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉचंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी मार्गदर्शन करताना शिवजन्मोत्सव आपण का साजरा करतो तसेच आपण महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी का साजरी करतो याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. मनीष सोनवणे यांनी महाराजांचा जाज्वल इतिहास सांगातांना सांगितेले के जगात अनेक राजे महाराजे होऊन गेले परंतु साडेतीनशे वर्षानंतरही स्मरणात राहणारा एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. त्याचे कारण म्हणजे महाराजांनी राज्य हे रयतेसाठी निर्माण केले होते, महाराजांकडे धार्मिक भेद भाव, स्त्री-पुरुष भेदभाव, अंधश्रद्धा या गोष्टींना कधीच थारा दिला नाही.

महाराज हे विज्ञानवादी होते तर दुसरे प्रमुख वक्ते कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे हिंदवी स्वराज्याची स्थापना आणि जनतेला गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त करण्याच्या योगदानावर प्रकाश टाकताना छत्रपती शिवाजी महाराजांनी मोघलांच्या ताब्यातील अनेक किल्ले जिंकून घेतले जनतेचे अन्याय, अत्याचार यापासून रक्षण केले. उत्तम प्रशासन करताना जनतेचा राजा रयतेचा राजा म्हणून लौकिक मिळवला असे सांगितले.

उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल सावळे यांनीही याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांची जडणघडण हिंदवी स्वराज्याची स्थापना व आजच्या पिढीने त्यांचा आदर्श घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहून आदर्श नागरिक व्हावे असे आवाहन याप्रसंगी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बी.एम. सोनवणे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.नरेंद्र डोखे यांनी मानले. या प्रसंगी प्रा.डॉ.प्रविण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रविंद्र मोरे, एमसीव्हीसी चे उपप्राचार्य प्रा.अजिंक्य ठाकरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ



**मालेगाव शहर:** मसगा महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. अर्जुन नेरकर. शेजारी प्रा. अजय ठाकरे.

# लोकनेते व्यंकटराव हिरे यांची जयंती उत्साहात

मालेगाव शहर : येथील मसगा महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे यांची जयंती उत्साहात करण्यात आली. प्राचार्य डॉ सुभाष निकम यांच्या हस्ते लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या जीवन कार्यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रा. अजय ठाकरे यांनी लोकनेत्यांच्या आर्थिक, सामाजिक, सहकार, व शैक्षणिक जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेतला. दुसरे व्याख्यान वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. अर्जुन नेरकर यांचे झाले. डॉ.नेरकर यांनी लोकनेते व्यंकटराव हिरे यांची जनसामान्यायांबरोबर नाळ जोडलेली होती. लोकनेते हे वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून लोकोपयोगी कामे करण्यावर अधिक भर द्यायचे. यावेळी उपप्राचार्य डॉ. डी.के. हलवर, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, कुलसचिव रघुनाथ शेलार, कनिष्ठचे उपप्राचार्य प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक रवींद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य अजिंक्य ठाकरे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी व आभार एस. आर. दुकळे यांनी मानले.

Nashik, Malegaon
26/04/2023 Page No. 4

24 April 2023

दैनिक
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज
महाराष्ट्र सारथी

# म.स.गा. महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे जयंती उत्साहात साजरी

**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**मालेगाव ।प्रतिनिधी :**

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे यांची ९४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष निकम यांच्या हस्ते लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या प्रतिमेचे पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहात लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या जीवन कार्यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

पहिले व्याख्यान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. अजय ठाकरे यांचे संपन्न झाले. प्रा. अजय ठाकरे यांनी लोक नेत्यांच्या आर्थिक, सामाजिक, सहकार, व शैक्षणिक जीवन कार्याचा सविस्तर आढावा घेतला. याप्रसंगी दुसरे व्याख्यान वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी



विभाग प्रमुख डॉ. अर्जुन नेरकर यांनी लोकनेते व्यंकटराव हिरे यांनी केलेल्या जन हिताचे कार्य उपस्थितांसमोर मांडले महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील लोकांचा पाणी प्रश्न लोकनेत्यांनी मेहनतीने व निष्ठेने सोडविला. अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी लोकनेत्यांच्या समाजाभिमुख कामांचा आढावा घेतला. लोकनेते हे त्यांच्या कर्तुत्वाने घडलेत. महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या माध्यमातून बहुजनांच्या मुलांना वैज्ञानिक व व्यावसायिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी.के. हलवर, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील, कुलसचिव श्री. आर. एच. शेलार, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य अजिंक्य ठाकरे उपस्थित होते. कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी व आभार प्रदर्शन प्रा. एस. आर. दुकळे यांनी केले.

# मानव विकास हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याचा केंद्रीय दृष्टिकोन होता-डॉ.एम.व्ही.हिरे



**मालेगाव:-महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख व अर्थतज्ञ, सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. एम.व्ही. हिरे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम हे होते.**

प्रतिमा पूजनानंतर झालेल्या व्याख्यानात डॉ. एम.व्ही. हिरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन हा मानव विकासाचा होता असे प्रतिपादन केले. ब्रिटिश राजवटीत हिंदुस्थानची होत असलेली आर्थिक पिळवणूक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शैक्षणिक जीवनात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विदेशात शिक्षण घेत असताना जगासमोर मांडले. वैज्ञानिक संशोधन पद्धतीचा आधार घेत बाबासाहेबांनी ब्रिटिश राजवटीत हिंदुस्तानचे होणारे आर्थिक पतन संदर्भात विहाय स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेबांना गरिबी व शोषण मुक्त भारताची उभारणी करायची होती. त्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी व्यापक स्वरूपात कार्य हाती घेतले होते. साम्यवादी विचारसरणीचा अवलंब करून त्यांनी देशात मिश्र अर्थव्यवस्था असावी असा दृष्टिकोन मांडला होता. सर्वसामान्य जनतेला समान न्याय व समान हक्क मिळावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले जीवन खर्च केले.

भारतीय शेती क्षेत्रावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी औद्योगिकीकरणाची आवश्यकता आहे असे ठामपणे सांगितले. म्हणून स्वातंत्र्या नंतर १९४८ मध्ये पहिले औद्योगिक धोरण जाहीर करावे लागले. सर्वसामान्य जनतेवर सरसकट कराची आकारणी करू नये तर उत्पन्ना नुसार कराची आकारणी करावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आग्रही होते. स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पंडित जवाहर लाल नेहरूंच्या पहिल्या मंत्रिमंडळात स्वतंत्र भारताचे पहिले सामाजिक न्याय व कायदामंत्री झाले. तेव्हा त्यांनी समाजातील सर्व स्तरातील व सर्व प्रवर्गातील महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवायचे होते. त्यासाठी व्यापक समाज कल्याणासाठी हिंदू कोड बिल संसदेच्या पटलावर मांडले होते. परंतु तत्कालीन काही शासनकर्त्यांच्या विरोधामुळे त्यांना महिलांच्या सक्षमीकरणासाठी अडचण निर्माण झाली. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री-पुरुष समानतेवर ठाम राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या सर्व कार्यावरून त्यांचा दृष्टिकोन हा मानव विकासाचाच होता असे स्पष्ट होते. असे डॉ. एम.व्ही.हिरे यांनी विविध उदाहरणांचा दाखला देत सविस्तर स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्व समावेशक विचारसरणीचे होते असे गौरव उद्गार काढले. वयाच्या २२ व्या वर्षी परदेशी विद्यापीठात उच्च शिक्षण घेतले. तत्कालीन विश्व प्रसिद्ध कोलंबिया व लंडन विद्यापीठात अर्थशास्त्र विषयातील संशोधन कार्य केले. संशोधनकार्यासाठी हाती घेतलेले विषय ब्रिटिश राजवट भारताची कशा पद्धतीने आर्थिक पिळवणूक करत आहे हे स्पष्ट केले.

अर्थशास्त्र विषयातील डीएस. सी. (डॉक्टर ऑफ सायन्स) ही पदवी प्राप्त केलेले आजपर्यंत ते एकमेव भारतीय आहेत ही भारतीयांसाठी गौरवाची बाब आहे. भारतात विविध विचारधारे चे प्रवर्ग आहेत. परंतु भारतीय संविधान हिच एक सर्वमान्य विचारधारा आहे. म्हणून भारतात विविधतेत एकता आहे. याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना द्यावे लागते. संविधानामुळे सर्व भारतीयांना मूलभूत हक्क आणि कर्तव्य मिळाले आहेत. यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महामानव ठरतात. असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी काढले.

व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. डी. के. हलवर, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिक्य ठाकरे व कार्यालयीन अधीक्षक श्री. जयवंत कटारे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले. व आभार प्रदर्शन इंग्रजी विभागाचे प्रा. हिरालाल नरवाडे यांनी केले.

14 April 2023

# छत्रपती शिवाजी महाराज विज्ञान युगाची कास धरणारे रयतेचे राजे–प्रा.डॉ.ए एम बिरारी



मालेगांव:-हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, राजकीय व्यवस्थापनाचे गुरु, संवाद कौशल्य, चातुर्य, धाडसी, मुत्सद्दी चपळता, असे सर्व गुण अंगी असणारे जाणता राजा , छत्रपती शिवाजी महाराज हे विज्ञान युगाची कास धरणारे व रयतेचे राजे होते, चारित्र्यवान, स्त्रियांना सन्मान देणारे, १८ पगड जातीच्या लोकांना एकत्र करून त्यांनी स्वराज्य निर्माण केले असे प्रतिपादन प्रा.डॉ ए.एम. बिरारी यांनी महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे दिनांक १९ फेब्रुवारी २०२३ रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती प्रसंगी काढले.

महाविद्यालयातील संयोजन समिती व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिव जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कु. कोमल शेलार व कु. वैशाली शिंदे या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नैतिक मूल्यांची जोपासना करावी, छत्रपती शिवाजी महाराज यांचे बुद्धी चातुर्य हा गुण अंगीकारावा असे विचार मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभागाचे प्रा.सुभाष आहिरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. अजय अहिर व नियोजन प्रा. डॉ. यु.के कुडासे यांनी केले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. डी. के. हलवर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील ,कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रफुल्ल निकम ,अजिंक्य ठाकरे , पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, कुलसचिव श्री. रघुनाथ शेलार, कार्यालय अधीक्षक श्री. जयवंत कट्यारे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधु-भगिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

19 feb 2023

# मसगा महाविद्यालय येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली



मालेगांव:-महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना पुण्यतिथी निमित्त आदरांजली वाहण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सत्य आणि अहिंसा या तत्त्वज्ञानाची विचार सरणी अंगीकारणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना प्राचार्य डॉ.सुभाष निकम यांच्या हस्ते प्रतिमापूजन आणि श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याकरीता जनसामान्यांची चळवळ त्यांनी उभी केली. भारतीय स्वराज्याची पायाभूत भरणी महात्मा गांधींनी केली असे प्रतिपादन याप्रसंगी प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ यु.के. कुडासे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. चंद्रशेखर निकम, डॉ.डी. के. हलवर, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ.एन.बी.बच्छाव, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक रवींद्र मोरे, प्रा.अजिक्य ठाकरे, कुलसचिव श्री.आर.एच. शेलार, कार्यालयीन अधीक्षक श्री. जयवंत कटयारे तसेच प्राध्यापक बंधु भगिनी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

30 january 2023

# मसगा महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस याना अभिवादन



मालेगांव कॅम्प:-सोमवार दिनांक २३ जानेवारी २०२३ रोजी महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे नेताजी सुभाष चंद्र बोस यांची १२६ जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांच्या हस्ते नेताजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तद्नंतर इतिहास विभाग प्रमुख प्रा. यु.के कुडासे यांनी नेताजींच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला त्यात त्यांनी सांगितले की नेताजी आयसीएस झाले होते, पण त्यांनी ब्रिटिशांची नोकरी केली नाही ते दोन वेळा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यांनी फॉरवर्ड ब्लॉक निर्माण केले. त्यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली व भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी प्रयत्न केले.

विमान अपघातात त्यांचे दुर्दैवी निधन झाले ते हयात असते तर भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे तेच हिरो राहिले असते असे उद्गार प्रा. डॉ. यु.के.कुडासे यांनी या प्रसंगी काढले. अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ.सुभाष निकम यांनी विद्यार्थ्यांना संस्कार होण्यास व युवकांना आपला इतिहास कळण्यासाठी थोर व्यक्तींच्या जयंत्या या प्रेरणादायी ठरत असतात असे विचार मांडले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सी.एम निकम,डॉ. डी. के. हलवर कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल निकम, पर्यवेक्षक प्रा.रविंद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे प्रा. अजिंक्य ठाकरे, कुलसचिव रघुनाथ शेलार,कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. योगेश शास्त्री, प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी परिश्रम घेतले.

23 January 2023

सायं दैनिक

# मोक्षिणी वार्ता

## डॉ. बाबासाहेबांचे विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय– जयवंत कट्यारे



मालेगाव । भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या जीवनात सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, अशा विविध क्षेत्रात कार्य करतांना तळागाळातील जनते चा विचार केला व आपल्या कार्याचा, विचारांचा जनतेला कसा लाभ होईल हे बघितले असे उद्गार महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात श्री जयवंत कट्यारे यांनी काढले, याप्रसंगी त्यांनी बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवा-तीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश शिरुडे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. चंद्रशेखर निकम, शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. डॉ. नंदकुमार बच्छाव, कुलसचिव श्री रघुनाथ शेलार, कनिष्ठ विभागाचे उप प्राचार्य प्रा.प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, उप प्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू-भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. योगेश शास्त्री यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ . यु.के. कुडासे, प्रा. डॉ. अर्जुन नेरकर यांनी परिश्रम घेतले.

6 Dec.2022

सकाळ



मालेगाव : मसगा महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अभिवादन करताना डॉ. सुभाष निकम, डॉ. अमित रजक, भगवान बागूल.

# मसगा महाविद्यालयात जयंतीनिमित्त अभिवादन

मालेगाव शहर : येथील "मसगा" महाविद्यालयात राजमाता जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुभाष निकम होते. प्रतिमेचे पूजन डॉ. निकम, प्रमुख वक्ते डॉ. अमित रजक व भगवान बागूल यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. अमित रजक यांनी जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती दिली. भगवान बागूल यांनी राजमाता जिजाऊ यांच्या कार्याविषयी माहिती उलगडून सांगितली. डॉ.निकम यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ.नरेंद्र डोखे यांनी तर परिचय डॉ. व्ही. डी. सूर्यवंशी यांनी करून दिला. उपप्राचार्य डॉ. चंद्रशेखर निकम, डॉ डी. के. हलवर, डॉ.एन.बी.बच्छाव, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम ,पर्यवेक्षक प्रा.रवींद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे महाविद्यालयाचे कुलसचिव रघुनाथ शेलार, कार्यालयीन अधिक्षक जयवंत कटयारे उपस्थित होते.

Nashik, Malegaon
13/01/2023 Page No. 4

12 jan.2023

# म. ज्योतीबा फुलेंचे कार्य प्रेरणादायी– डॉ.योगेश शास्त्री



मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित म. स .गा महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे दिनांक २८ नोव्हेंबर सोमवारी, महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दिनेश शिरूडे यांच्या हस्ते महात्मा फुलेंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. योगेश शास्त्री यांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. तरुण पिढीने त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घ्यावी, त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे, असे उद्गार काढले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना, डॉ. दिनेश शिरूडे यांनी विद्यार्थ्यांना अशा कार्यक्रमातून महान व्यक्तिमत्त्वांची ओळख होते असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. कुडासे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. नरेंद्र डोखे यांनी केले या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सी. एम. निकम, डॉ. एन .बी .बच्छाव, रघुनाथ शेलार, जयवंत कटधारे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. प्रफुल्ल निकम, रवींद्र मोरे, अजिंक्य ठाकरे, सर्व प्राध्यापक बंधू भगिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने हजर होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. अर्जुन नेरकर यांनी परिश्रम घेतले.

28 Nov.2022

मंगळवार, दि. १५ नोव्हेंबर २०२२

# मसगा कॉलेजात पं. नेहरुंना अभिवादन



मालेगाव । सोमवार दिनांक १४ जानेवारी २०२२ रोजी महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश शिरूडे यांच्या मार्गदर्शनाने भारता चे पहिले पंतप्रधान भारत रत्न पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. चंद्रशेखर निकम हे होते. याप्रसंगी प्रा. डॉ. यु.के कुडासे यांनी पंडितजींच्या कार्य कर्तुत्वाचा आढावा घेतला त्याचबरोबर त्यांनी पंडितजींच्या नेतृत्वाखाली भारताने कशा पद्धतीने प्रगती केली याचे कथन केले, पंडीतजींना स्वतंत्र आधुनिक भारताचे शिल्पकार देखील म्हटले जाते असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे डॉ. चंद्रशेखर निकम पंडीतजींना लहान मुले खूप आवडत व लहान मुलांमध्ये ते रमत असत त्यामुळे त्यांचा जन्मदिन हा आपण बालदिन म्हणून देखील साजरा करतो असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. योगेश शास्त्री यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. अर्जुन नेरकर यांनी मानले. या कार्यक्रमा प्रसंगी कुलसचिव रघुनाथ शेलार तसेच जूनियर विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, एम.सी.व्ही सी चे प्रा.अजिंक्य ठाकरे, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कटपारे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14 Nov.2023

# मौलाना अबुल कलाम हे महात्मा गांधीचे सच्चे अनुयायी होते–प्रा.मोरे



मालेगांव:–म.स.गा महाविद्यालयांमध्ये मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती दिना चे औचित्य साधून राष्ट्रीय शिक्षण दिवस म्हणून साजरा करण्यात आला यावेळी पर्यवेक्षक प्रा रविंद्र मोरे कार्यक्रमाचे, प्रमुख वक्ते म्हणून आपल्या मनोगतातून मोलाना अबुल कलाम आझाद यांच्या स्वातंत्र्य चळवळ व हिंदु–मुस्लीम ऐक्य चळवळीतील तसेच खिलापत चळवळी–तील महत्वपुर्ण भुमिका बद्दल माहिती दिली.

तसेच अबुल कलाम हेच महात्मा गांधीचे सच्चे अनुयायी होते म्हणून त्यानी स्व:तला त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात झोकुन दिले मानवता हाच खरा धर्म आहे असे मत अबुल कलाम याचे मत होते म्हणून त्याना सरकारने मरणोत्तर भारत रत्न पुरस्कार दिला त्यांचे योगदान विसरता येणार नाही असे आपल्या मनोगतातून प्रा रविंद्र मोरे यानी व्यक्त केले कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ दिनेशजी शिरोडे सर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगताततुनय यूजीसी व आयआयटी सारख्या संस्थेच्या स्थापनेतील सहभागाविषयी माहिती दिली. यावेळी प्राचार्य डॉ दिनेश शिरूडे उप प्राचार्य डॉ.सी एम निकम प्रा प्रफुल्ल निकम यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले सुत्र संचालन व आभार प्रदर्शन प्रा.मिलिंद पवार यांनी केले.

यावेळी शैक्षणिक पर्यवेक्षक डा.नंदु बच्छाव उपप्राचार्य प्रा.अजिंक्य ठाकरे, डॉ. योगेश शास्त्री डॉ नरेंद्र डोखे, कुलसचिव रघुनाथ शेलार उप–स्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.अभिजित पाटील, प्रा.हितेश पवार व प्रा.अशोक खांडेकर यांनी परिश्रम घेतले .

11 Nov.2022

सकाळ

# 'आझाद महात्मा गांधींचे सच्चे अनुयायी'

सकाळ वृत्तसेवा

मालेगाव शहर, ता. ११ : मानवता हाच खरा धर्म आहे, आपण सर्व एक आहोत, ही भूमिका सातत्याने मांडली. स्वातंत्र्य चळवळीतील महात्मा गांधी यांचे सच्चे अनुयायी म्हणून मौलाना आझाद यांचे नाव घेतले जाते, असे मत मसगा महाविद्यालयाचे पर्यवेक्षक रवींद्र मोरे यांनी व्यक्त केले.



मालेगाव : मसगा महाविद्यालयात मौलाना आझाद यांना अभिवादन करताना शिक्षक.

मसगा महाविद्यालयात मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त मोरे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिनेश शिरूडे होते. या वेळी उपप्राचार्य डॉ. सी. एम. निकम, कनिष्ठचे उपप्राचार्य प्रफुल्ल निकम उपस्थित होते.

प्रा. मोरे म्हणाले, मौलाना आझाद यांचे स्वातंत्र्य चळवळ व हिंदु- मुस्लिम ऐक्य चळवळीतील महत्त्वपूर्ण योगदान आहे. प्राचार्य शिरूडे यांनी यूजीसी व आयआयटीसारख्या संस्थेच्या स्थापनेतील मौलाना आझाद यांच्या सहभागाविषयी माहिती दिली. शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. नंदु बच्छाव, उपप्राचार्य अजिंक्य ठाकरे, डॉ. योगेश शाली, डॉ. नरेंद्र डोखे, कुलसचिव रघुनाथ शेलार उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अभिजित पाटील, हितेश पवार, अशोक खांडेकर यांनी पुढाकार घेतला. मिलिंद पवार यांनी सूत्रसंचालन केले.

Nashik, Malegaon
12/11/2022 Page No. 2

11 nov.2022

सकाळ

# कर्मवीरांचे शैक्षणिक कार्य देदीप्यमान

## हिरे पुण्यतिथीदिनी प्रा. एन. डी. पगार यांचे प्रतिपादन

**मालेगाव शहर, ता. ७ :** कर्मवीर भाऊसाहेब हिरे समाजवादी विचारांचे होते. त्यांच्यातील कर्तृत्व, नेतृत्व व दातृत्व या त्रि:सूत्रीने राजकारणात ठसा उमटविला. राजकारणात असूनही त्यांना सत्तेचा मोह नव्हता. भाऊसाहेबांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य हे देदीप्यमान होते, असे उद्‌गार प्रा. एन. डी. पगार यांनी काढले.



**मालेगाव : मसगा महाविद्यालयात कर्मवीर भाऊसाहेब हिरे पुण्यतिथीनिमित्त व्याख्यानात बोलताना प्रा. एन. डी. पगार. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. दिनेश शिरूडे.**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात रविवारी (ता. ६) महात्मा गांधी विद्या मंदिर संस्था व आदिवासी सेवा समितीचे संस्थापक कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिनेश शिरूडे होते. मंचावर उपप्राचार्य डॉ. चंद्रशेखर निकम, शैक्षणिक समन्वयक डॉ. नंदकुमार बच्छाव, कुलसचिव रघुनाथ शेलार, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कटारे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक रवींद्र मोरे, अजिंक्य ठाकरे उपस्थित होते. प्रा. पगार म्हणाले, कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्यावर महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव होता. प्राचार्य डॉ. शिरूडे यांनी कर्मवीरांचे कार्य सर्वांना प्रेरणादायी आहे, असे सांगितले.

प्रा. डॉ. डी. के. हलवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. नरेंद्र दोखे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. उद्धव कुडाले, डॉ. योगेश शास्त्री, प्रा. चेतन येवले, डॉ. अर्जुन नेरकर यांनी पुढाकार घेतला.

Nashik, Malegaon

6 Nov.2022

# सरदार पटेल जयंती व स्व. इंदिरा गांधी पुण्यतिथी साजरी



मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय येथे दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश शिरुडे यांच्या हस्ते सरदार पटेल व श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, यानंतर इतिहास विभाग प्रमुख प्रा. यु.के. कुडासे यांनी सरदार पटेल यांनी संस्थानांचे भारतात केलेले विलनीकरण तसेच त्यांना लोहपुरुष व सरदार का म्हणतात याविषयी माहिती दिली, तसेच श्रीमती इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयकरण तसेच १९७१ ची पाकिस्तान विरुद्ध च्या युद्धातला विजय व इतर निर्णय यांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगेश शास्त्री यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. नरेंद्र डोखे यांनी केले या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ सी.एम निकम, डॉ. एन बी. बच्छाव, कुलसचिव रघुनाथ शेलार, कार्यालय अधीक्षक जयवंत कट्यारे व इतर मान्यवर सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी विद्यार्थी बहुसंख्येने हजर होते. कार्यक्रम च्या यशस्वीतेसाठी प्रा. ए .जी. नेरकर यांनी परिश्रम घेतले.

31 oct,2022

दिनकर
शहर–परिसर
पान ३
मंगळवार, दि. ४ ऑक्टोबर २०२२

# ंधी व लालबहादूर शास्त्री' यांना आदरांजली



बडोदा बँकेतर्फे महाविद्यालयाला कुलरची भेट



वर्धापन दिनानिमित्त केंब्रीएस विद्यालयाची रॅली

### कावरा विद्यालय

### मसगा महाविद्यालय

### कन्या विद्यालय


### के.बी.एच.विद्यालय

आजचा एसएमएस

Sooraj ki pehli kiran khushi de aapko, dusri kiran hasi, teesri tandarusti, chauthi kamyaabi, bas ab zyaada nahi phir garmi lagegi na aapko.

1 oct.2022

# स्वामी विवेकानंद दिग्वीजय दिन साजरा




मालेगाव । महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय माले-गाव येथे प्राचार्य डॉ.डी.एफ. शिरुडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या वनस्प-ती शास्त्र विभागातर्फे, स्वामी विवेकानंद दिग्विजय दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी वनस्पतीशास्त्राचे प्रा.डॉ.योगेश शास्त्री यांचे स्वामी विवेकानंद आणि शिकागो जागतिक सर्वधर्म परिषद या विषयावर व्याख्यान झाले त्यांनी आपल्या व्याख्यानात स्वामींचे चरित्र व त्यांचे कार्य विद्यार्थ्यांपुढे मांडले. तसेच शिकागो येथे ११ सप्टेंबर १८९३ रोजी भरलेल्या जागतिक सर्वधर्म परिषद याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. ही परिषद स्वामींनी जिंकली याचा इति वृत्तांत त्यांनी आपल्या व्याख्यानात दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डी. जी. जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. वाय. बी. मामुडे यांनी केले या कार्यक्रमाला एफ. वाय. बीएससी. वन स्पती शास्त्र विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

11.sept 2022

# मसगा महाविद्यालयात शिक्षक दिन उत्सहात



**प्रबंधभूमी न्युज**

**मालेगांव –** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगांव कॅम्प येथे शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते , या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डी. एफ. शिरुडे हे होते , प्रथमता डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थी वर्गाच्या वतीने उपस्थित असणाऱ्या प्राध्यापकांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला, तसेच शिक्षक दिनाचा इतिहास त्याची परंपरा शिक्षक दिनाचे औचित्य उद्देश या संदर्भामध्ये विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे

विद्यार्थ्यांना संस्कारांचे महत्त्व पटवून दिले आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एफ. शिरुडे यांनी जीवन जगताना उद्देश पूर्ण जीवनाचे महत्त्व स्पष्ट केले तसेच आपल्या जीवनाला पूर्णत्वाच्या दिशेने घेऊन जाणे गरजेचे आहे हे सोदाहरण स्पष्ट केले सबंध कार्यक्रमाचे संयोजन इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. यु .के. कुडासे यांनी केली कार्यक्रमाप्रसंगी उपप्राचार्य डॉ .सी .एम .निकम ,ज्येष्ठ प्रा. एम व्ही हिरे, व्ही डी सूर्यवंशी , डॉ एम .एस .भंडारी , डॉ .बी .एम. सोनवणे ,डॉ. डी. एन .सोनवणे, प्रा.ए एन .बाविस्कर, प्रा .एच .डी .नरवडे यांच्या सह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधु भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

5 sept 2022

# म.स.गा.महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**मालेगांव:-म.स.गा. महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती प्राचार्य डॉ.डी एफ शिरूडे यांच्या मार्गदर्शना खाली व उपप्राचार्य डॉ. सी एम निकम यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरी करण्यात आली.**

यावेळी महाविद्यालयाचे कुलसचिव रघुनाथ शेलार, कार्यालयीन अधीक्षक जयंत कट्यारे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी.एन निकम, पर्यवेक्षक आर ए मोरे तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी प्रा. आर एस बागुल यांनी आपल्या मनोगतातून लोकमान्य टिळकांचे भारतीय स्वातंत्र्यातील योगदाना बद्दल माहिती दिली. प्रा.मिलिंद पवार यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्रासाठी योगदान याविषयी माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. मिलिंद पवार यांनी केले.

1 Aug.2022



मालेगाव : महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. योगेश शास्त्री. व्यासपीठावर प्राचार्य दिनेश शिरुडे, सी. एम. निकम, प्रा. रवींद्र मोरे आदी.

# टिळक धीरोदात्त व्यक्तिमत्त्व : डॉ. शास्त्री

**मालेगाव :** येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य दिनेश शिरुडे यांच्या हस्ते लोकमान्यच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर डॉ. योगेश शास्त्री यांनी लोकमान्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. त्यात त्यांनी लोकमान्यांच्या जीवनाचे अनेक महत्त्वाचे प्रसंग सांगितले. वेगवेगळ्या प्रसंगात लोकमान्य कसे धीराने वागले हे सांगताना त्यांचे व्यक्तिमत्व एक धीरोदात्त व्यक्तिमत्व होते असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला उपप्राचार्य सी. एम. निकम, कुलसचिव आर. एच. शेलार, जयवंत कट्यारे, प्रा. प्रफुल निकम, प्रा. रवींद्र मोरे, प्रा. अजिंक्य ठाकरे आदींसह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. नरेंद्र डोखे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

1Aug.2022

# म.स.गा.महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा




मालेगाव कॅम्प:-दि.२६ जुलै २०२२ रोजी महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात कारगिल विजय दिवस महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. डि. एफ. शिरुडे यांच्या मार्गदर्शनातून साजरा करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सी.एम.निकम यांच्या हस्ते भारतमाता व शस्रास्त्र यांचे पूजन करण्यात आले. तदनंतर लेफ्टनंट बी.बी. वाघमारे यांनी कारगिल विजय दिवसाचे महत्त्व विशद करतांना पाकिस्तानच्या कूटनीतीला भारतीय सैन्यातील बहादूर जवानांनी आपल्या बलिदानाने उत्तर दिले. तब्बल ६० दिवस सुरु राहिलेल्या या युद्धात ५५० जवानांना वीरमरण आले तर दिड हजार सैनिक जखमी झाले होते. या जवानांच्या बलिदानाची आठवण म्हणून २६ जुलै हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा करण्यात येतो असे त्यांनी सांगितले. कारगिल विजय दिवसा निमित महाविदयालयात उपप्राचार्य डॉ. सी. एम . निकम, प्रा. डॉ.टी.एस.सावळे , माजी एन. सी. सी. अधिकारी कॅप्टन आर .ए .पवार, सीटीओ प्रा. एस. ए .सांगळे, प्रा.डॉ सी.डी राजपूत , प्रा डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते एन. सी. सी. पार्क मध्ये वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी एन.सी.सी चे विद्यार्थी मोठे

26 jully 2022

# मसगा कॉलेजात लोकनेते कै. व्यंकटरराव हिरे पुण्यतिथी साजरी




मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संस्था व आदिवासी सेवा समिती चे संवर्धक लोकनेते कै.व्यंकटरावजी हिरे यांची ४२ वी पुण्यतिथी आज दि.३/७/२०२२ वार-रविवार रोजी महाविद्यालयात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवाती ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश शिरुडे यांच्या हस्ते कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या समाधी स्थळाला व पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला, तदनंतर श्रीमती रेणुका आजी हिरे यांच्या समाधीस्थळी व लोकनेते व्यंकटरावजी हिरे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन आंदराजली वाहण्यात आली.

म.स.गा. महाविद्यालयात नारायणी महिला भजनी मंडळच्या सर्व महिला भगिनींनी सकाळी सुगम संगितासह व भजन गायनाचा कार्यक्रम केला. त्यात भजनी मंडळाच्या प्रमुख सौ. शुभांगी फडके, सौ.गीता पांडे, सौ उज्वला टिपरे, सौ.संध्या रणभोर, सौ.अंजली खोडके, सौ.सरला बेलन, सौ.अंजली पोफळे, सौ. जयश्री जोशी, सौ प्रियंका गिलाणकर, सौ. प्रिया फडके, सौ.कल्पना देशपांडे, सौ. उज्वला कुलकर्णी, सौ. अनुराधा कोतुळकर यांनी विविध सुमधुर भक्ती गीते सादर केली. या प्रसंगी भुषण गुरव यांनी ढोलकी वादन व पेटीवादक शुभम गुरव यांनी केले. कार्यक्रमाची सांगता झाल्यावर नारायणी महिला भजनी मंडळाच्या सर्व भगिनींच्या हस्ते लोकनेते व्यकंटराव हिरे यांना आदरांजली वाहण्यात आली व त्यांच्या हस्ते महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी मालेगांव शहरातील प्रतिष्ठित नागरिक, उप प्राचार्य यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

3 jully 2022

# मसगा कॉलेजात शाहू महाराज जयंती साजरी



मालेगाव । दि.२६ जून २०२२ रोजी, महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय येथे राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे अप्पर पोलीस अधीक्षक मालेगाव चंद्रकांत खांडवी हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस चंद्रकांत खांडवी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश शिरुडे यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. योगेश शास्त्री यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेत ला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रवीण पाटील यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. नरेंद्र डोखे यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांच्यासह कनिष्ठ विभागाचे उप प्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम, प्रा. रवींद्र मोरे, पोलीस दलातील कर्मचारी तसेच प्रा. डॉ. सी.डी राजपूत, प्रा. डॉ.ए.डी पवार, प्राध्यापक प्राध्यापक मिलिंद कुलकर्णी, प्रा. वैशाली साळुंखे प्रा. सूर्यभान सांगळे, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, विद्यार्थी कल्याण मंडळाचे विद्यार्थी उपस्थित होते.

26 june 2022